जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024
सकाळ

## विद्यापीठात अभिवादन

शिवाजी विद्यापीठात आज संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र - कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजपाल मोहारीकर, डॉ. पी. एन. देवळी, डॉ. ए. इ. मानकर, भरत रावण, युवराज टिपुगडे उपस्थित होते.

2 6 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी सृजनतेचा विकास करावा

## डॉ. नंदकुमार मोरे : मराठी अध्यापक संघाच्या पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'वाचनामुळे जीवनाची आणि जगण्याची दृष्टी मिळते. सर्जनशीलता ही प्रत्येक क्षेत्रात उपयुक्त ठरते. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत सृजनतेचा विकास करावा', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या गौरव पुरस्कार वितरणप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. किरण गुरव प्रमुख उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या पुढील जीवनाच्या उभारणीसाठी स्वभाषेतून सृजनशिलतेचा विकास साधण्याची आवश्यकता आहे. साहित्य आणि साहित्यिक माणसांची मने घडवित असल्याचे डॉ. मोरे यांनी सांगितले.



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघातर्फे शिक्षकांना डॉ. नंदकुमार मोरे, किरण गुरव यांच्या हस्ते पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यावेळी शेजारी राजेंद्र पाटील, पी. डी. पाटील, बी. एस. कांबळे, विजय सरगर उपस्थित होते.

### बावीस शिक्षकांचा सन्मान

**रवींद्र महापुरे, सुलोचना बागडी, संजय पाटील, रामकृष्ण गव्हाणकर, हणमंत पाऊसकर, पांडुरंग गुरव, विठ्ठल पात्रे, तानाजी लोखंडे, मिनाज पटेल, रमेश पाटील, अशोक शिर्के, संजय पाटील, रत्नाकर सरदेसाई, दौलतराव कांबळे, रूपाली मोटे, अजित गायकवाड, रमेश वसगडे, विलास कांबळे, धनश्री मोहिते, शिवाजी चौगुले यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवाजी पाटील, सुधीर आमणगी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.**

'ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक वि. स. खांडेकर, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, रणजित देसाई, आनंद यादव, राजन गवस, कृष्णा खोत आदी साहित्यिकांचे मराठी साहित्यात मोलाचे योगदान असल्याचे डॉ. गुरव यांनी सांगितले.

यावेळी संघाचे उपाध्यक्ष पी.डी. पाटील, नेताजी डोंगळे, विजय सरगर, बी. एस. कांबळे, राहुल टिपुगडे, एम.एस.पाटील, सोनल गाडेकर, सदाशिव-हाटवळ, सचिन हावळ, अन्वर पटेल, मारुती लाड, राजेंद्र भोरे, गुलाबराव लांडगे, मारुती मुसळे, एस.डी. खतकर, संजय साबळे, रवि पाटील, व्ही. जी. सुतार, अरुण कुंभार आदी उपस्थित होते. संघाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. सचिन यादव यांनी सूत्रसंचालन केले. मनीषा डांगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
26 FEB 2024
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक वाटचालीत सृजनतेचा विकास करावा

## शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांचे आवाहन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिक्षणातील बदल शिक्षकांनी स्वीकारले पाहिजेत. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत सृजनतेचा विकास करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या गौरव पुरस्कार वितरणप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. किरण गुरव होते.

डॉ. मोरे म्हणाले, विज्ञान-तंत्रज्ञान व प्रसार माध्यमांच्या विळख्यात शिक्षण घेणारे विद्यार्थी अडकले आहेत. विद्यार्थ्यांनी यातून बाहेर पडत पुढील जीवनाच्या उभारणीसाठी स्वभाषेतून सृजनशिलतेचा विकास साधण्याची आवश्यकता आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. किरण गुरव म्हणाले, मराठी साहित्यातील पहिल्या ज्ञानपीठ पुरस्काराची सुरुवात कोल्हापूरच्या मराठी मातीतूनच झाली. ज्ञानपीठ पुरस्कार



**कोल्हापूर :कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या गौरव पुरस्कारप्राप्त शिक्षकांबरोबर डॉ. किरण गुरव, डॉ. नंदकुमार मोरे, राजेंद्र पाटील, पी. डी. पाटील , बी. एस. कांबळे, विजय सरगर आदी.**

प्राप्त साहित्यिक वि. स. खांडेकर, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, रणजित देसाई, आनंद यादव, राजन गवस, कृष्णा खोत आदी साहित्यिकांचे मराठी ग्रामीण साहित्याचे मोलाचे योगदान आहे. मराठी विषयात विविध उपक्रम राबवून मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणाऱ्या आणि विविध परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना गौरव पुरस्कार, प्रेरणा पुरस्कार, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी स्वाक्षरी स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या शिक्षकांना गौरवण्यात आले.

स्वागत अरुण कुंभार यांनी केले. प्रास्ताविक कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी केले. पाहुण्यांची ओळख व्ही. जी. सुतार यांनी करून दिली.

सूत्रसंचलन सचिन यादव यांनी केले. आभार मनीषा डांगे यांनी मानले. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष पी. डी. पाटील, नेताजी डोंगळे, विजय सरगर, बी. एस. कांबळे, राहूल टिपुगडे, एम. एस. पाटील, सोनल गाडेकर, सदाशिव -हाटवळ, सचिन हावळ, अन्वर पटेल, मारुती लाड, राजेंद्र भोरे, गुलाबराव लांडगे, मारुती मुसळे, एस. डी. खतकर, संजय साबळे, रवी पाटील आदी उपस्थित होते.

26 FEB. 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्यावतीने रविवारी गौरव पुरस्कार वितरण केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. किरण गुरव, राजेंद्र पाटील, आदी उपस्थित होते.

# शिक्षकांनी सृजनतेचा विकास करावा

## नंदकुमार मोरे यांचे आवाहन : 'कोजिम'च्यावतीने गुणवंतांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिक्षकांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत सृजनतेचा विकास करावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्यावतीने रविवारी आयोजित केलेल्या गौरव पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, आजच्या विज्ञान, तंत्रज्ञान व प्रसार माध्यमांच्या विळख्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या पुढील जीवनाच्या उभारणीसाठी स्वभाषेतून सृजनशीलतेचा विकास साधण्याची आवश्यकता आहे.

शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव म्हणाले, मराठी साहित्यातील पहिल्या ज्ञानपीठ पुरस्काराची सुरुवात कोल्हापूरच्या मराठी मातीतूनच झाली. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक वि. स. खांडेकर, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, रणजित देसाई, आनंद यादव, राजन गवस, कृष्णात खोत या साहित्यिकांचे मराठी ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान आहे. मराठी साहित्याचा समृध्द वारसा पुढे नेण्यासाठी आपण सर्वांनी प्रशत्न करावेत.


अरुण कुंभार यांनी स्वागत केले. 'कोजिम'चे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. व्ही. जी. सुतार यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. 'कोजिम'चे उपाध्यक्ष पी. डी. पाटील, नेताजी डोंगळे, विजय सरगर, बी. एस. कांबळे, राहुल टिपुगडे, एम. एस. पाटील, सोनल गाडेकर, सदाशिव-हाटवळ, सचिन हावळ, अन्वर पटेल, मारुती लाड, राजेंद्र भोरे, गुलाबराव लांडगे, मारुती मुसळे, एस. डी. खतकर, संजय साबळे, रवि पाटील उपस्थित होते. मनीषा डांगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 FEB 2024
सकाळ

मराठी भाषा गौरव दिन विशेष

# चंदगडी बोलीभाषेला राजमान्यता

कोल्हापूरच्या दक्षिणेला चंदगड तालुका येतो. येथे चंदगडी बोलीभाषा बोलली जाते. गोमांतक, कुडाळी (कोकणी), कन्नड आणि मराठी यांच्या मिलाफातून ही भाषा उदयाला आली. मात्र, या भाषेला खूप मोठा इतिहास आहे. या शिवाय मराठीमधील प्रत्येक शब्दाला चंदगडीमध्ये प्रतिशब्द आहे. या भाषेची वाक्यरचनाही वेगळी आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी या भाषेवर संशोधन करून या भाषेची ओळख जगाला करून दिली. ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांनी 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा प्रकल्प हाती घेतला होता. या प्रकल्पामध्ये डॉ. मोरे सहभागी झाले होते. त्यांनी यातील महाराष्ट्र खंडामध्ये चंदगडी बोलीभाषेचा लेख लिहिला. त्यानंतर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा 'चंदगडी बोली इतिहास आणि भूगोल' असा प्रकल्प मिळाला. यामध्ये त्यांनी चंदगड प्रदेशाचे भौगोलिक स्थान, इतिहास, बोली भाषेचा विकास, वैशिष्ट्ये, समाजजीवन या सर्व गोष्टींवर काम केले. यासाठी त्यांनी इ. स. १६०० पासूनचे ऐतिहासिक दस्तऐवज संकलित केले व त्याचा अभ्यास केला. यामुळे या बोलीभाषेला शास्त्रीय संशोधनाचे अधिष्ठान प्राप्त झाले. कुमारभारतीच्या दहावीच्या पाठ्यपुस्तकात २०१३मध्ये चंदगड बोली भाषेचा समावेश करण्यात आला. चंदगड बोलीला भाषेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम बनवला गेला. तसेच, 'नेट' आणि 'सेट' परीक्षेसाठीही चंदगडी बोली भाषा समावेश करण्यात आला. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या संशोधनामुळे वैशिष्ट्यपूर्ण चंदगडी बोलीभाषा सर्वांसमोर आली. आता शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतून चंदगडी बोली भाषेच्या संशोधनावरील खंड प्रकाशित होणार आहेत.



नंदकुमार मोरे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024
पुढारी

# शिक्षकांनी सृजनतेचा विकास करावा

## डॉ. नंदकुमार मोरे; मराठी अध्यापक संघ पुरस्कार वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षकांनी शैक्षणिक वाटचाल करताना सृजनतेचा विकास करावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या गौरव पुरस्कार वितरणप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक डॉ. किरण गुरव होते.

डॉ. मोरे म्हणाले, आजच्या विज्ञान तंत्रज्ञान व प्रसार माध्यमांच्या विळख्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जीवनाच्या उभारणीसाठी स्वभाषेतून सृजनशीलतेचा विकास साधण्याची आवश्यकता आहे. मराठी साहित्यातील पहिल्या ज्ञानपीठ पुरस्काराची सुरुवात कोल्हापूरच्या मराठी मातीतून झाली. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचे मराठी ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान आहे, असे मत डॉ. गुरव यांनी व्यक्त केले.

यावेळी शिक्षक गौरव पुरस्कार, प्रेरणा पुरस्कार व मराठी स्वाक्षरी स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या शिक्षकांना सन्मानित केले गेले. अरुण कुंभार यांनी स्वागत केले. कोजिमचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख व्ही. जी. सुतार यांनी करून दिली. यावेळी उपाध्यक्ष पी. डी. पाटील, नेताजी डोंगळे, विजय सरगर, बी. एस. कांबळे, राहुल टिपुगडे, एम. एस. पाटील, सोनल गाडेकर, सदाशिव ऱ्हाटवळ, सचिन हावळ उपस्थित होते. सचिन यादव यांनी सूत्रसंचालन केले. मनीषा डांगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024
पुढारी

# 'भारतीय मुसलमान' पुस्तकाचे आज प्रकाशन

कोल्हापूर : भारतीय मुस्लिम समाजाबद्दलची वर्तमान परिस्थिती, त्यांचा जीवनसंघर्ष स्पष्ट करणारे 'भारतीय मुसलमान' या संशोधनपर सैद्धांतिक अशा चार ग्रंथांचा प्रकाशन समारंभ सोमवारी (दि. २६) आयोजित केला आहे. अशी माहिती या पुस्तकाचे लेखक प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी पत्रकार बैठकीत दिली. शाहू स्मारक भवनमध्ये सायंकाळी ५ वा. हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे असतील. रूकडी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गिरीश मोरे, इचलकरंजीचे प्रा. डॉ. रफीक सूरज आदी उपस्थित राहणार आहेत. या पुस्तकांत भारतातील मुस्लिमांविषयीची मांडणी केली आहे. पत्रकार परिषदेला अनिल म्हमाणे, डॉ. बुडचडे, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. शोभा चाळके, पूजा जाधव आदी उपस्थित होते.

26 FEB 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील गणितीय उपक्रमांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : राष्ट्रीय गणित दिन ही एक दिवसाची औपचारिकता न मानता दोन महिन्यांहून अधिक काळ विविध गणितीय उपक्रम शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागाने आयोजित केले. त्यात विद्यापीठासह महाविद्यालये तसेच शालेय विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहभाग लक्षणीय होता.



विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविले. त्यात 'विविध भारतीय गणिततज्ज्ञ आणि त्यांचे गणितातील योगदान' या विषयावरील सादरीकरणाने राष्ट्रीय गणित दिन झाला. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांचे 'डिफरंट काईंड्स ऑफ प्रूफ्स' या विषयावर व्याख्यान झाले. 'रिप्रेझेंटेशन थिअरी' या विषयावरील विशेष कार्यशाळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. हेमंत भाटे यांचे मार्गदर्शन लाभले. पदव्युत्तर गणित विभागांसाठी प्रश्नमंजूषा, निबंध, सेमिनार स्पर्धा झाल्या. शालेय विद्यार्थी, शिक्षकांना गणित ऑलिंपियाडची माहिती आणि या स्पर्धांसाठीची तयारी यासंबंधी पुण्याच्या प्रा. नौरोसजी वाडिया कॉलेजमधील डॉ. सी. एस. निमक यांचे व्याख्यान झाले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांत महाविद्यालयांसह शालेय विद्यार्थ्यांचा सहभागही लक्षणीय ठरला.

## विलिंग्डन, विवेकानंद, विद्यापीठ हायस्कूलचे यश

शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या भित्तीपत्रक स्पर्धेत अनुक्रमे विद्यापीठ हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल आणि महाराष्ट्र हायस्कूल यांनी पारितोषिके मिळवली. निबंध स्पर्धेत विलिंग्डन महाविद्यालय, सेमिनार स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय विजयी झाले. प्रश्नमंजूषा स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय यांनी प्रथम तर शिवाजी विद्यापीठ चमूने द्वितीय क्रमांक पटकावला. डॉ. सी. एस. मांजरेकर, पी. जे. पाटील, एस. एस. सुतार, आसावरी जाधव, सी. एस. निमकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. डॉ. एम. टी. गोफणे, के. डी. कुचे, जे. पी. खराडे, एस. एस. कुंभार, जे. पी. भोसले, एस. के. खराडे, एस. डी. थिटे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय विज्ञान सप्ताह

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सोमवार (दि.२६) पासून राष्ट्रीय विज्ञान दिन सप्ताहानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत तज्ज्ञांची व्याख्याने, प्रकल्प स्पर्धा होणार आहेत.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी सकाळी १०.३० वाजता पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहात राष्ट्रीय विज्ञान दिन समारंभाचे उद्‌घाटन होणार आहे. गोवा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. आर. एस. गड यांचे बीजभाषण होईल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दि. २७ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. दीपक शेटे यांचे व २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. सतीश शर्मा यांचे व्याख्यान होईल. त्यानंतर विज्ञान प्रदर्शन (दि. २७), प्रकल्प स्पर्धा (दि. २८), निबंधलेखन व वक्तृत्व स्पर्धा (दि. २९), प्रश्नमंजुषा स्पर्धा (दि. १ मार्च), समारोप समारंभ व पारितोषिक वितरण (दि. २ मार्च) असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. समन्वयक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातर्फे दि. २७ व २८ फेब्रुवारी रोजी 'अमृतकाळ आणि भारतातील आदिवासींचे समावेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन दि. २७ रोजी प्रा. सोनझारिया मिंज यांच्या बीजभाषणाने होणार असून याप्रसंगी अध्यक्षस्थान कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत.

या परिषदेचा समारोप प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अभ्यासकेंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2024

लोकमत

# डॉ. आर. के. शानेदिवाण यांना पुरस्कार

कोल्हापूर : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांना अहमदनगर येथील टाकळीभान येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देण्यात येणारा २०२३-२४ चा मराठी राजभाषा रत्न राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचा श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी गेली २८ वर्षे मराठी भाषेची केलेली निरंतर सेवा, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार आणि मराठी भाषेत केलेले संशोधन याची दखल घेऊन ज्ञानज्योती संस्थेने हा पुरस्कार त्यांना जाहीर केला आहे. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे तसेच कॉंग्रेसचे आमदार पी. एन. पाटील यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.